# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डब्ल्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०३, तंत्र शिक्षण**<br>**बाब क्रमांक: १०१, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४८५३ | १० | "उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत डॉक्टर पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याचा शासनाचा मनोदय असताना, आर्थिक दृष्ट्या कमकुवत आणि मागास समाजातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या विरुद्ध परदेशी विद्यापीठे भारतात आणण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला असणे, परदेशी विद्यापीठांना भारतात आल्यानंतर प्रवेश शुल्क आकारणी, शिक्षकांच्या नेमणुका, अभ्यासक्रम तयार करणे याबाबतीत स्वातंत्र्य मिळणार असल्यामुळे आणि भारतातील विद्यापीठांना अनेक बंधनामध्ये कामकाज करावे लागल्यामुळे शिक्षण क्षेत्रात भेदभाव निर्माण होऊन अनुचित स्पर्धा घडण्याची शक्यता, तसेच भरमसाठ फीस प्रवेशावर कोणतेही नियंत्रण नसणे, दुर्बल घटकातील विद्यार्थी या विदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणे अशक्य असणे, अर्थात केवळ 'आहे रे' वर्गातील श्रीमंतांच्या मुलांना त्याचा फायदा होणार असल्यामुळे आणि शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात विषमता वाढीस लागण्याची निर्माण झालेली शक्यता या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने परदेशी विद्यापीठांना राज्यात प्रवेश देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| (२) | ४८५६ | १० | "उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत डॉक्टर पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याचा शासनाचा मनोदय असताना, सावित्रीबाई फुले विद्यापीठातील विद्यार्थ्यांपुढे मोठ्या प्रमाणावर समस्या उद्भवल्या असणे, प्रवेश घेतल्यानंतर अवघ्या 20% अभ्यासक्रम पूर्ण होतो न होतो तोच एम.ए प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांवर प्रथम सत्र परीक्षा देण्याची वेळ आलेली असणे, नाशिक विद्यापीठामार्फत 28 फेब्रुवारी पासून परीक्षांचे नियोजन करण्यात आले असता अर्धवट अभ्यासक्रमावर विद्यार्थ्यांना सदर परीक्षा द्यावी लागत असल्यामुळे ही परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी विद्यार्थी करीत असताना त्याकडे विद्यापीठ प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता यासंदर्भात करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | ४८५७ | १० | "उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत डॉक्टर पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करण्याचा शासनाचा मनोदय असताना, राज्यातील खाजगी विद्यापीठांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या हालचाली शासनाने सुरू केलेल्या असणे, पुढील शैक्षणिक वर्षापासून सदर निर्णय लागू करण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे आगामी काळात खाजगी विद्यापीठातील अभ्यासक्रमांच्या शुल्कावर सरकारचे नियंत्रण येण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, मात्र खाजगी विद्यापीठे पूर्णपणे स्वयं अर्थ साहित्य असल्याने या निर्णयाला खाजगी विद्यापीठाच्या प्रशासनाकडून होत असलेला विरोध, राज्यात सद्यस्थितीत 22 पेक्षा जास्त खाजगी विद्यापीठे कार्यरत असून येत्या शैक्षणिक वर्षात ही संख्या 40 पर्यंत जाण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, एकट्या पुण्यातच सद्यस्थितीत 11 खाजगी विद्यापीठे कार्यरत असणे, येत्या शैक्षणिक वर्षापासून त्यात आणखी चार खाजगी विद्यापीठाची भर पडणार असणे,आणि शिक्षण संस्था आपल्या महाविद्यालयाचे विस्तार करून त्याचे खाजगी विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी पुढे येत असताना अशावेळी राज्यातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे कठीण होणार असल्यामुळे विद्यापीठांच्या शुल्कांवर राज्य शासनाने नियंत्रण आणण्याची आवश्यकता या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई